सकाळ | पुणे जिल्हा

# बारामतीत लवकरच 'ई-लर्निंग'

## विद्या प्रतिष्ठानचा पुढाकार; 'इस्त्रो' करणार सहकार्य

सकाळ
चला जिल्हा बदलू या!

### ग्रंथालयात 'ई-फॉर्मेट' सुविधा

**जगात मान्यता पावलेली अनेक जर्नल्स ग्रंथालयात पुस्तक स्वरूपात लगेच मिळू शकत नाहीत, ही बाब विचारात घेऊन विद्या प्रतिष्ठानच्या ग्रंथालयात 'ई-फॉर्मेट' सुविधा लवकरच मिळणार आहे. जगातील पाचशे मान्यताप्राप्त जर्नल्स व संदर्भ विद्यार्थी इंटरनेटच्या माध्यमातून मिळवू शकतील. यासाठीचे सर्व शुल्क संस्था भरणार असून विद्यार्थ्यांना ते मोफत दिले जाणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळावा यासाठी ग्रंथालय २४ तास सुरू ठेवण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न होणार आहेत.**

**बारामती, ता. २९ :** अत्याधुनिक शिक्षण पद्धती आता ग्रामीण भागातही येऊ लागल्या असून विद्यार्थ्यांना अतिउच्च तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणाची नवीन दालने खुली होण्याची प्रक्रिया विद्या प्रतिष्ठानमार्फत वेगाने राबविली जात आहे. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, जलसंपदामंत्री अजित पवार यांच्यासह संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या दूरदृष्टीमुळे बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान संस्थेमध्ये आता लवकरच 'ई-लर्निंग' सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. देवसरकर यांनी याबाबत माहिती दिली. अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करून देणारे ग्रामीण भागातील हे पहिलेच महाविद्यालय ठरणार आहे. पवईच्या नामांकित 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' व जगप्रसिद्ध 'इस्त्रो' या दोन संस्थांच्या सहकार्याने येत्या तीन महिन्यांत 'ई-लर्निंग' सुविधा विद्या प्रतिष्ठानमधील विद्यार्थी व प्राध्यापकांना उपलब्ध होणार आहे. 'व्ही सॅट'च्या माध्यमातून ही सुविधा विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. त्यामुळे ज्या प्राध्यापकांचे केवळ नावच ऐकलेले होते, त्या प्राध्यापकांकडून घेतल्या जाणाऱ्या तासांना त्यांना 'लाइव्ह टेलिकास्ट'द्वारे प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार आहे. तज्ज्ञ प्राध्यापकांचे विचार पान २ वर ▶

# बारामतीत लवकरच 'ई-लर्निंग'

▶ पान १ वरून

ऐकण्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे विद्यार्थी व पालकांना शंकानिरसनही करून घेता येणार आहे.

यासाठी एक स्वतंत्र वाहिनीच सुरू करण्यात येणार असून या माध्यमातून ३० विविध प्रकारच्या अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन मुलांना मिळणार आहे. या 'ई-लर्निंग' सेंटरचे वेळापत्रक आल्यानंतर महाविद्यालयाच्या वेळापत्रकात त्यानुसार बदल करण्यात येणार असल्याचे देवसरकर यांनी सांगितले. केवळ मार्गदर्शनच नाही; तर हा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने यशस्वीरीत्या पूर्ण केला तर त्याला 'आयआयटी'चे प्रमाणपत्रही दिले जाणार आहे. या सर्वांत विशेष म्हणजे अभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्यार्थ्याला ही सुविधा प्राप्त करण्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क द्यावे लागणार नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्चतम शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा निर्णय विद्या प्रतिष्ठानच्या व्यवस्थापन मंडळाने घेतला असल्याचे डॉ. देवसरकर यांनी नमूद केले.

या शिवाय अणुऊर्जा आयोगाकडून परवानगी मिळाल्यानंतर 'मास्टर प्रोग्रॅम इन न्युक्लिअर सायन्स' हा दोन वर्षांचा नवीन अभ्यासक्रम सुरू होणार आहे. अभियांत्रिकीमधील कोणतीही पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवू शकणार आहे. या शिवाय आपत्ती व्यवस्थापनातील नवीन अभ्यासक्रमही सुरू केले जाणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना उच्चतम गुणवत्ता मिळण्यासाठी प्राध्यापकांमधील गुणवत्तेत वाढ व्हावी, यासाठी 'क्वालिटी इंप्रूव्हमेंट प्रोग्रॅम' करण्यात आला असून दर वर्षी काही प्राध्यापकांना उच्च ज्ञान मिळविण्यासाठी नामांकित संस्थांतून पाठविले जाणार आहे. विद्या प्रतिष्ठानच्या 'स्कूल ऑफ आर्किटेक्चर'लाही मान्यता मिळाली असून लवकरच ही संस्थाही सुरू होणार आहे.